महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे Rs.2/-

शनिवार ❖ १८ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - २०४ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# ‘पगारात भागवा !’

## राजपत्रित अधिकारी महासंघाच्या बैठकीत सूचना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.१७ :** दि.०७ फेब्रुवारी १९८६ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने पूर्वनियोजन व इतर विषयांबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीकरिता महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार श्री.ग.दि. कुलथे यांची विशेष उपस्थिती लाभली तर त्यांच्यासमवेत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या



ठाणे जिल्हा समन्वय समितीचे नवनियुक्त अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, कोकण विभागाचे सहसचिव डॉ.अविनाश भागवत, सरचिटणीस तथा जिल्हा माहिती अधिकारी श्री.मनोज शिवाजी सानप, राज्य कार्यकारिणीचे श्री.रमेश जंजाळ, श्री.सुदाम टाव्हरे, श्री.दिगंबर सिरामे, श्री.बापूसाहेब सोनवणे, श्री.सिदप्पा बोरकडे, श्री.मोहन पवार, डॉ.नितीन मुळीक, डॉ.तरुलता धनके व विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महासंघाच्या कल्याण केंद्र इमारत बांधकाम निधी संकलनाची प्रगती, महासंघाचे कार्यसंस्कृती अभियान, पगारात भागवा अभियानाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी, जिल्हा समन्वय समितीचे पुनर्गठन आदी विषयांवर चर्चा झाली.(यावेळी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार श्री.ग.दि. कुलथे यांचे प्रमुख मार्गदर्शन झाले. तर महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे अध्यक्ष श्री.विनोद देसाई, सरचिटणीस श्री.समीर भाटकर यांनी महासंघाच्या पुढील वाटचालीविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तर ठाणे जिल्हा समन्वय समितीचे नवनियुक्त अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी आगामी काळात जिल्ह्यातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या एकत्रित समन्वयातून ठाणे जिल्हा समन्वय समिती उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला.



# पालकमंत्रिपदाचा तिढा कायम !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नाशिक : पालकमंत्रिपदाचा तिढा पुढील आठवड्यात सुटण्याची चिन्हे असून, नाशिकच्या पालकमंत्रिपदाची सूत्रे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतःकडेच ठेवणार असल्याचे बोलले जात आहे. गिरीश महाजन यांच्याकडे कुंभमेळा मंत्रिपद राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. प्रयागराज येथील कुंभमेळा यशस्वी होत असल्याने तेवढ्याच ताकदीचा व यशस्वी कुंभमेळा नाशिकमध्ये करण्यासाठी फडणवीस हे सूत्रे हाती ठेवणार असल्याची माहिती समोर येत आहे.

भारतीय जनता पक्षाच्या ’थिंक टँक’मधील सदस्यांनीही फडणवीस यांनीच नाशिकचे पालकमंत्रिपद घ्यावे, असा अहवाल दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. नाशिकवर महायुतीमधील तिन्ही पक्षांनी दावा केल्याने पालकमंत्रिपदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सात जागा निवडून आल्याने त्यांनी दावा केला आहे; तर भाजपचाही १०० टक्के स्ट्राइक रेट असल्याने दावा आहे. शिवसेनेला उत्तर महाराष्ट्रात विस्तार करायचा असल्याने पालकमंत्रिपद हवे आहे. जिल्ह्यात भाजपला एकही मंत्रिपद मिळाले नाही. सत्ता, विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा जिल्हा असल्याने पकड ठेवण्यासाठी कुंभमेळा मंत्रिपदासह पालकमंत्रिपद भाजपकडे असावे, असा आमदारांसह पदाधिकाऱ्यांचा आग्रह असल्याने भाजपचा पालकमंत्रिपदासाठी आग्रह आहे. महायुतीमधील तिन्ही पक्षांना नाशिकचे पालकमंत्रिपद हवे असल्याने राज्यातील इतर जिल्ह्यांतील पालकमंत्रिपदांची घोषणा अद्याप होत नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दत्तक पित्याकडे पालकत्व २०१७ मध्ये महापालिकेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक दत्तक घेण्याची घोषणा केली. देशातील पहिला टायर बेस निओ मेट्रो प्रकल्पाची घोषणा झाली, मात्र केंद्रीय स्तरावर मेट्रोचा प्रस्ताव अडकला आहे. फडणवीस यांच्या पालकत्वाच्या घोषणेनंतर विरोधी पक्षांनी हाच मुद्दा पकडून त्यांना वारंवार घेरल्याने मुख्यमंत्रिपदाच्या तिसऱ्या टर्ममध्येही सल काढण्याची संधी आहे. दुसरीकडे उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे कुंभमेळा सुरू आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जातीने लक्ष घालत कुंभमेळा यशस्वी केला. त्यामुळे प्रयागराजच्या धर्तीवर नाशिकचा कुंभमेळा साजरा करण्यासाठी नाशिकचे पालकत्व मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वीकारावे, असा आग्रह धरला जात आहे. भाजपच्या श्रेष्ठींनीही फडणवीस यांच्याकडेच पालकमंत्रिपद असावे, असा अहवाल सादर केल्याची माहिती आहे. गिरीश महाजन कुंभमेळा मंत्री प्रयागराजच्या धर्तीवर नाशिकमधील कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र, मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार करताना वेळेची अडचण येऊ शकते. त्यामुळे कुंभमेळा मंत्री म्हणून गिरीश महाजन यांच्याकडे सूत्रे राहतील; तर पालकमंत्री म्हणून नियोजन करण्याचे अधिकार मुख्यमंत्री फडणवीस स्वतःकडे ठेवतील, असे बोलले जात आहे.

# उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त पदी मनिषा आव्हाळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर महानगरपालिकेत नविन प्रशासक तथा आयुक्त सौ. मनिषा आव्हाळे यांची नियुक्ती झाली असुन त्यांनी आज दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी मध्यान्हपूर्व कार्यभार हाती घेतला. त्या अनुषंगाने महापालिका स्थायी समिती सभागृहात सर्व वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये माननीय आयुक्त यांचे सर्व विभाग प्रमुख मार्फत स्वागत करण्यात आले. सदर बैठकीत अतिरिक्त आयुक्त श्री. जमिर लेंगरेंकर अतिरिक्त आयुक्त, श्री किशोर गवस उपायुक्त, विजय खेडकर, मुख्य लेखा अधिकारी किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक शरद देशमुख, कार्यकारी अभियंता तरुण शेवकानी व खरात, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, कर निर्धारक व संकलक निलम कदम सिस्टम अनालिस्ट श्रदधा बाविस्कर, सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी, विशाल कदम, सलोनी निवकर तसेच विभाग प्रमुख म्हणुन निलम कदम, अंकुश कदम, मनोज जाधव, राजेश घनघाव तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सदर बैठकित मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे सुचना देवून त्यांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.




## सर्व विभाग प्रमुखांना सूचना

१) सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागाच्या संचिका थेट आयुक्तांकडे सादर न करता त्या सादरी करनाच्या टप्प्याने सादर कराव्यात. महत्त्वाच्या संचिका/ ४ दिवस अगोदर सादर कराव्यात व त्यामध्ये पृष्ठ क्रमांक सविस्तर माहिती महत्त्वाच्या कागदपत्रांना पताका लावण्यात याव्यात.

२). विभाग प्रमुखाने त्यांच्या विभागाच्या पीपीटी सादर करून त्यामध्ये कर्मचारी संख्या, योजनांची माहिती ,अडचणी समस्या यांचा समावेश करावा.

३) विभाग प्रमुखानी त्यांचे मासिक/साप्ताहिक नियोजन तयार करावे.

४) आयुक्तांकडे बैठकीत मोबाईलवर एसएमएस किंवा कॉलिंग करू नये

५) व्हाट्सअप ग्रुप वर एका विभागाचे एकच अधिकारी ठेवावेत. प्रकारचे कार्यालयीन कामकाज व्यतिरिक्त तर माहिती पोस्ट करू नये.

६.) सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे.

७) कार्यालयात स्वच्छता, अभिलेख वर्गीकरण, बैठक व्यवस्था इत्यादी बाबींना प्राधान्य द्यावे.

८) ई ऑफिस अंमलबजावणी पुढील तीन महिन्यात करावी. विशेष शासन निर्णय सादर करून त्यातील महत्त्वाच्या सूचना पाळाव्यात. अशाप्रकारे मान्य आयुक्त यांनी सर्व विभाग प्रमुखांना सूचना देऊन बैठक समाप्त करण्यात आली. अशी माहिती जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी दिली



# कल्याण लोकसभेतील प्रकल्पांचा आढावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण लोकसभा मतदारसंघासह आसपासच्या भागात वाहतूक आणि दळणवळणाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या प्रकल्पांची उभारणी सुरू आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्यालयात महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांच्या उपस्थितीत बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी कल्याण रिंग रोड, मेट्रो मार्ग १४ चा सविस्तर प्रकल्प आराखडा, मेट्रो ५ आणि मेट्रो १२ ची प्रगती, ठाणे फ्री वे तसेच उल्हासनगर, अंबरनाथ आणि कल्याण-डोंबिवली परिसरात सुरू असलेल्या अनेक विकासकामांचा आढावा घेतला. सर्व प्रकल्पांचा आढावा घेत त्यांच्या पूर्णत्वासाठी योग्य त्या सूचना दिल्या. तसेच या प्रकल्प उभारणीतील अडचणींवर तोडगा काढत हे प्रकल्प नियोजित वेळेत मार्गी लावण्यास सांगितले. यावेळी खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महत्वाचे प्रकल्प आणि त्यासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण, कामांची पूर्तता आणि प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी येत असलेल्या अडचणी या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. प्रकल्पांना गती द्यायची असेल तर लवकरात लवकर जमीन अधिग्रहण करा, अशी सूचनाही यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. बदलापूर - कांजुरमार्ग मेट्रो मार्ग १४ चा फायदा अधिकाधिक भागाला कसा होईल, त्यासाठी मार्गाच्या आरेखनात बदल करता येईल का याची चाचपणी करण्याची सूचना केली. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या हद्दीतील ३८० कोटी रुपये खर्चातून उभारण्यात येत असलेल्या रस्त्यांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील कल्याण अहिल्यानगर महामार्गावरील वर्दळीच्या शहाड उड्डाणपूल रुंदीकरणाची निविदा जाहीर करण्यात आली असून त्यासाठी आवश्यक जागेचे अधिग्रहण तातडीने करण्याच्या सूचना उल्हासनगर मनपा आयुक्तांना दिल्या. उल्हासनगर मनपा क्षेत्रातील प्रमुख ७ रस्त्यांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. कल्याण फाटा उड्डाणपूल आणि ऐरोली काटई फ्री वे या प्रकल्पांसाठी वेगाने जागा अधिग्रहीत करण्याची सूचना केली. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त मुद्गल, अतिरिक्त महानगर आयुक्त मनुज जिंदाल, कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त इंदुराणी जाखड, उल्हासनगर महापालिका आयुक्त जमीर लेंग्रेकर, ठाणे महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, तसेच कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, प्रशांत काळे, निलेश शिंदे, नवीन गवळी, अरुण आशान, राजेंद्र चौधरी, वामन म्हात्रे आदी पदाधिकारीही उपस्थित होते.

# तीस शहरे परिवहन सेवेपासून वंचित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** सर्वसामान्यांना परवडणारी सार्वजनिक परिवहन सेवा सक्षम करण्यासाठी राज्य सरकार धोरणात्मक उपाययोजना करीत असले तरी प्रत्यक्षात वास्तव दाहक असल्याचे चित्र आहे. राज्यातील ४४ पैकी ३० शहरांमध्ये महापालिका- नगरपालिकांची सार्वजनिक परिवहन सेवाच उपलब्ध नाही. १४ शहरांमध्ये परिवहन सेवा उपलब्ध असली तरी त्यात बसगाड्यांचा मोठा तुटवडा आहे. सध्या राज्यातील परिवहन सेवेला बळकटी देण्यासाठी सुमारे २४ हजार बसगाड्यांची आवश्यकता आहे. खासगी वाहनांची संख्या कमी करून पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी काम करणाऱ्या ‘इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सपोर्टेशन अँड डेव्हलपमेन्ट पॉलिसी’ने (आयटीडीपी) राज्यातील शहरांतील परिवहन सेवेचा डिसेंबर २०२४मध्ये अभ्यास केला. केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या सार्वजनिक वाहतूक सेवेतील निकषानुसार एक लाख प्रवाशांमागे ६० बस असे प्रमाण आहे. राज्यातील १४ शहरांतील परिवहन सेवा हा निकषही पूर्ण करीत नसल्याचे ‘आयटीडीपी’ने स्पष्ट केले आहे.

# मेट्रो ४ अ’चा खर्च ६३.६७ कोटींनी वाढला

## प्रकल्प पूर्णत्वाची मुदतही चुकवली

## दिरंगाईसाठी कंत्राटदाराला नाममात्र दंड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कामास विलंब झाल्याने कंत्राटदाराने मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार एमएमआरडीएने कंत्राटदाराला एप्रिल २०२५ पर्यंतची मुदतवाढ दिल्याचे माहिती अधिकारात स्पष्ट झाले. (संग्रहित छायाचित्र)



**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) ‘कासारवडवली - गायमूख मेट्रो ४ अ’ प्रकल्पाच्या खर्चात ६३ कोटी ६७ लाख रुपयांनी वाढ झाली आहे. या मेट्रो मार्गिकेच्या पूर्णत्वाची मुदत ३१ मार्च २०२४ अशी होती, मात्र या मुदतीत काम पूर्ण न झाल्याने कंत्राटदाराला एप्रिल २०२५ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे. खर्चात झालेली वाढ आणि प्रकल्पाला झालेला विलंब यामुळे संबंधित कंत्राटदाराला केवळ २२ लाख रुपये दंड आकारण्यात आल्याचे माहिती अधिकारात उघड झाले आहे.

मुंबई आणि ठाणे शहर मेट्रोने जोडण्यासाठी एमएमआरडीएने ‘वडाळा - ठाणे - कासारवडली मेट्रो ४’ प्रकल्प हाती घेतला आहे. याच ‘मेट्रो ४’चा विस्तार ‘कासारवडवली - गायमूख मेट्रो ४ अ’च्या माध्यमातून करण्यात येत आहे. या ‘मेट्रो ४ अ’ मार्गिकेचे काम सध्या एमएमआरडीए करीत आहे. २.७ किमी लांबीची आणि दोन मेट्रो स्थानकांचा समावेश असलेल्या या ‘मेट्रो ४ अ’ मार्गिकेच्या कामाचे कंत्राट जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट कंपनीला देण्यात आले आहे. या मार्गिकेच्या कामासाठीचे कार्यादेश ११ सप्टेंबर २०१९ रोजी देण्यात आले होते. या कार्यादेशानुसार ३१ मार्च २०२४ पर्यंत मार्गिकेचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अद्यापही या प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही. आजघडीला या प्रकल्पाचे ८६ टक्के काम पूर्ण झाले आहे. दरम्यान, एमएमआरडीएच्या मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी विभागाकडे माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी या प्रकल्पाविषयी माहिती अधिकाराखाली माहिती विचारली असता प्रकल्प खर्चात वाढल्याचे उघडकीस आले. त्याचबरोबर या प्रकल्पास विलंब झाल्याचे स्पष्ट झाले आहे. निविदेनुसार या मार्गिकेचे काम ३१ मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र कामास विलंब झाल्याने कंत्राटदाराने मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार एमएमआरडीएने कंत्राटदाराला एप्रिल २०२५ पर्यंतची मुदतवाढ दिल्याचे माहिती अधिकारात स्पष्ट झाले. एप्रिल २०२५ पर्यंतची मुदवाढ देण्यात आली असली तरी अद्यापही अंदाजे १४ टक्के काम शिल्लक असल्याने या प्रकल्पासाठी पुन्हा मुदतवाढ दिली जाण्याची शक्यता आहे. त्याचवेळी प्रकल्पास विलंब झाल्याने खर्चात वाढ झाल्याची माहिती एमएमआरडीएने गलगली यांना दिली. प्रकल्पाचा एकूण खर्च ४४०.८४ कोटी रुपये आहे. मात्र आता त्यात ६३.६७ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. एकूणच कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होऊ शकलेला नाही. असे असताना कंत्राटदारावर दिरंगाई केल्याप्रकरणी नाममात्र दंड आकारण्यात आल्याचेही स्पष्ट झाले आहे.

## गीतासार



**तस्मान्नार्हा वयं हन्तुं**
**धार्तराष्ट्रान स्वबान्धवान।**
**स्वजनं हि कथं हत्वा**
**सुखिनः स्याम माधव ।**
**१-३७ ।**

**अर्थ**

म्हणूनच हे माधवा, आपल्या बांधवांना, धृतराष्ट्रपुत्रांना, आम्ही मारणे योग्य नाही. कारण आपल्याच कुटुंबियांना मारून आम्ही कसे सुखी होणार? । १-३७ ।

**यद्यप्येते न पश्यन्ति**
**लोभोपहतचेतसः ।**
**कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च**
**पातकम । १-३८ ।**
**कथं न ज्ञेयमस्माभिः**
**पापादस्मान्निवर्तितुम।**
**कुलक्षयकृतं दोषं**
**प्रपश्यद्भिर्जनार्दन । १-३९ ।**

**अर्थ**

जरी लोभामुळे बुद्धी भ्रष्ट झालेल्या यांना कुळाचा नाश झाल्यामुळे उत्पन्न होणारा दोष आणि मित्राशी वैर करण्याचे पातक दिसत नसले तरी हे जनार्दना, कुळाच्या नाशाने उत्पन्न होणारा दोष स्पष्ट दिसत असतानाही आम्ही या पापापासून परावृत्त होण्याचा विचार का बरे करू नये? ।१-३८, १-३९ ।

**कुलक्षये प्रणश्यन्ति कुल**
**धर्माः सनातनाः ।**
**धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मो**
**ऽभिभवत्युत ।१-४० ।**

**अर्थ**

कुळाचा नाश झाला असता परंपरागत कुळधर्म नाहीसे होतात. कुळधर्म नाहीसे झाले असता त्या कुळात मोठ्या प्रमाणात पाप फैलावते. । १-४० ।

**आरोग्य टिप्स**

## हाडांसाठी हेही आवश्यक



**१. कमी कॅलरी आहार टाळा** - लठ्ठपणा वाढण्याच्या भीतीने आरोग्याबाबत जागरूक लोक अनेकदा कमी कॅलरीजचा आहार घेतात, परंतु हाडांच्या आरोग्यासाठी ते योग्य नाही कारण शरीराला कॅलरीज मिळाल्या नाहीत तर हाडे कमकुवत होऊ लागतात. कमी कॅलरीजमुळे, चयापचय गती देखील खूप कमी होऊ लागते, ज्यामुळे स्नायूंचे वस्तुमान कमी होऊ लागते. यामुळे हाड कमकुवत होतात. अभ्यासात असे आढळून आले आहे की जर रोज एक हजारपेक्षा कमी कॅलरी घेतल्यास हाडे कमकुवत होते.

**२. व्हिटॅमिन डी आवश्यक** - व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन के हाडांच्या मजबूतीसाठी सर्वात महत्वाची असतात. व्हिटॅमिन डीमुळे शरीरात कॅल्शियमचे शोषण शक्य होते. प्रति मिलि लिटर रक्तामध्ये ३० नॅनोग्राम व्हिटॅमिन डी असणे आवश्यक आहे. याच्या कमतरतेमुळे हाडांमध्ये ऑस्टियोपेनिया, ऑस्टियोपोरोसिस इत्यादी रोग होऊ शकतात.

**३. नियमित व्यायाम** - हाडे मजबूत करण्यासाठी तुम्ही व्यायामाची मदत घेऊ शकता. यासाठी असे व्यायाम करा ज्यात वजन उचलण्याची क्षमता वाढते. एका अभ्यासात असे आढळून आले की जे लोक एका वर्षासाठी वेट लिफ्टिंग प्रशिक्षणात सहभागी झाले होते त्यांची हाडांची घनता आणि हाडांचा आकार वाढला होता.



# नागा साधू कुठून येतात अन कुंभमेळ्यानंतर ते कुठे जातात?

महाकुंभात नागा साधू हे एक विशेष आकर्षण आहेत, जे त्यांच्या नग्न अवताराने, राखेने झाकलेल्या शरीराने आणि लांब ड्रेडलॉकने ओळखले जातात. हे साधू अखाड्यांशी संबंधित आहेत आणि कठोर तपस्या करतात.

हे साधू कुंभात इतक्या मोठ्या संख्येने दिसतात पण त्यानंतर ते गायब होतात. अर्थात त्यांचे दर्शन हे दुर्लभ होते. डेली शेअर नागा साधूंचे रहस्यमय जग त्यांच्या शिस्त, तपस्वीपणा आणि आध्यात्मिक जीवनावर आधारित आहे, जे त्यांना सामान्य मानवांपेक्षा वेगळे बनवते. कुंभ चित्रपट आणि मनोरंजन संपल्यानंतर हे नागा साधू अचानक कुठे गायब होतात ते जाणून घेऊया?

**कुंभमेळ्यानंतर नागा साधू कुठे जातात?**

राजनीति कुंभमेळ्यानंतर, नागा साधू त्यांच्या नेहमीच्या दिनचर्येत परततात. हे साधू प्रामुख्याने वाराणसीचा महापरिनिर्वाण आखाडा आणि पंच दशनाम जुना आखाडा या दोन प्रमुख आखाड्यांशी संबंधित आहेत. कुंभमेळ्यात तो त्याच्या दिगंबर स्वरूपात प्रकट होतो, जिथे तो त्रिशूळ, रुद्राक्षाचे मणी, राख आणि कधीकधी प्राण्यांच्या कातडीने सजवलेला असतो. कुंभमेळ्यातील पहिले शाही स्नान हे संत करतात, त्यानंतरच इतर भाविक स्नान करतात. कुंभमेळ्याच्या समाप्तीनंतर, नागा साधू दिगंबर रूप सोडतात, गमच्छा परिधान करतात आणि त्यांच्या आश्रमात परततात. त्यांचा असा विश्वास आहे की पृथ्वी ही पलंग आहे आणि आकाश ही पांघरूण आहे, जे त्यांच्या त्यागाच्या जीवनाचे प्रतीक आहे. आश्रमात ते ध्यान, योग आणि तपस्या करतात; ते समाजापासून दूर राहतात आणि आध्यात्मिक साधनेत मग्न राहतात.

**कसे जगतात नागा साधू जीवन ?**

कुंभमेळ्याच्या समाप्तीनंतर, नागा साधू त्यांच्या आखाड्यांमध्ये परततात आणि ध्यान, साधना आणि धार्मिक शिक्षणात गुंततात. कठोर तपस्या आणि ध्यान हे त्यांच्या तपस्वी जीवनशैलीतील मुख्य घटक आहेत. अनेक नागा साधू तपश्चर्या करण्यासाठी हिमालयात, जंगलात आणि एकांत ठिकाणी जातात, जिथे ते त्यांचे शरीर राखेने झाकून कठोर ध्यान करतात आणि फळे आणि फुले खाऊन जीवन जगतात. तीर्थक्षेत्रे त्यांचे निवासस्थान आहेत काही नागा साधू प्रयागराज, नाशिक, हरिद्वार आणि उज्जैन सारख्या तीर्थस्थळांमध्ये राहतात. ते दीक्षा घेऊन आपला उदरनिर्वाह करतात आणि धार्मिक तीर्थयात्रेलाही जातात. नागा साधूंचे जीवन समाजापासून वेगळे, पूर्ण त्याग आणि अध्यात्माने भरलेले आहे, जे त्यांना अद्वितीय बनवते.

**तेथे कर माझे जुळती**

# बालवीर शंकर महाले जयंती



**(१८ जानेवारी १९२५ - १९ जानेवारी १९४३)**

क्रांतिकारक शंकर दादाजी महाले यांची कथा वाचून अंगावर शहारे येतात . खुदीराम बोस यांच्यानंतर सर्व क्रांतिकारकांमध्ये वयाने लहान असलेला हा योद्धा बालवीर दिनांक १८ जानेवारी १९२५ रोजी नवाबपुरा , नागपूर येथे जन्मला. त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न जेमतेम असल्याने शंकर यांनी इयता ४थी नंतर शिक्षण घेतले नाही. ते लहानपणी मील मध्ये कामाला लागले.

एका पोलिस कर्मचाऱ्याच्या मृत्यू प्रकरणी शंकरला अटक करण्यात आली . परिणाम काय झाला ते पाहू या .

महात्मा गांधी यांच्या ' भारत छोडो 'आंदोलनात शंकर महाले सामील झाले होते. ९,१० आणि ११ ऑगस्ट १९४२ रोजी या तेजस्वी युवकाने हरताळ पाळून सभा घेतल्या. 'स्वातंत्र्याची ही अखेरची लढाई आहे' हे लोकांना समजावून सांगितले. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लोक आसुसले होते . म्हणून ठीक - ठिकाणी मिरवणुका निघाल्या होत्या. ब्रिटिशांच्या विरोधात निषेध मोर्चे निघाले होते. सरकारी कार्यालये व पोलीस चौक्या यांच्या समोर प्रचंड संख्येने येऊन क्रांतिकारक घोषणा देत होते . ' वंदे मातरम ' व 'भारत माता की जय ' अशा घोषणांनी सरकारी अधिकाऱ्यांची माती भडकली . पोलिसांनी अश्रू धुराच्या नळकांडया फोडल्या . ठिकठिकाणी गोळीबार ही झाला .

वस्तुस्थिती अशी होती की, शंकरच्या वडिलांना आंदोलनात सहभागी झाल्यामुळे पोलीसांनी गोळया घालून ठार केले होते. त्याचा बदला म्हणून शंकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १३ ऑगस्ट १९४२ च्या रात्री नागपूर पोलीस ठाण्यावर धाड टाकली. लाठीमार केला. त्यात एका पालिसाचा मृत्यू झाला. क्रांतिकारकांकडे असलेली शस्त्रे व दारुगोळा जप्त करण्यात आला . शंकर महाले आणि त्यांच्या सहकारी मित्रांना घेराव घालून पकडण्यात आले. पोलीस कर्मचाऱ्याच्या मृत्यूस शंकर महालेना जबाबदार धरण्यात आले . फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. इतर सहकाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. नागपूर मध्यवर्ती कारागृहात १९ जानेवारी १९४३ रोजी वयाच्या १८ व्या वर्षी त्यांना फासावर लटकावण्यात आले. अशाप्रकारे निष्ठावान तरुणाने स्वातंत्र्य देवतेला प्राणाचे अर्घ्य दिले. दिनांक १७ फेब्रुवारी २०११ रोजी भारताच्या १२व्या राष्ट्रपती मा. प्रतिभा पाटील यांनी त्यांच्या स्मरणार्थ स्मारक बांधले आहे . तसेच भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांनी नागपूर चौकात हुतात्मा शंकर यांचा पुतळा उभारला आहे . शंकर महाले यांच्या स्मृतीस त्रिवार वंदन!



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# कल्याणमधील गवळी बंधू तडीपार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)**



कल्याण पूर्व चक्कीनाका भागात प्रचंड दहशत असणारे, कोळेसवाडी पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील खतरनाक गुन्हेगार आकाश अभिमान गवळी (३३), शाम अभिमान गवळी ( ३४) आणि नवनाथ अभिमान गवळी (२८) या तीन भावांना ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातून तडीपार करण्याचा निर्णय पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी घेतला आहे.

या कारवाईने कल्याण, डोंबिवली शहरात अनेक वर्ष गुन्हेगारी करणाऱ्या गुंडामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. कल्याण मधील कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीत नियमित गुन्हे करणाऱ्या, दहशत पसरविणाऱ्या सक्रिय धोकादायक, खतरनाक गुंडांची यादी पोलिसांनी तयार केली आहे. अशा गुंडावर संघटित गुन्हेगारी कायद्याने तसेच हद्दपारीच्या कारवाया करण्यात येणार आहेत, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

आकाश अभिमान गवळी, शाम अभिमान गवळी, नवनाथ अभिमान गवळी हे तिन्ही भाऊ कल्याण पूर्व भागातील नंदादीप सोसायटी, नंदादीप नगर, चक्कीनाका भागात राहतात. त्यांच्यावर जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापती करणे, बेकायदा शस्त्र जवळ बाळगणे, मालमत्तेचे, गंभीर दुखापती करणे असे गुन्हे दाखल आहेत. त्यांच्यावर कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.या इसमांनी कल्याण पूर्व चक्कीनाका भागात दहशत निर्माण केली होती. लोक या तिन्ही इसमांना प्रचंड घाबरत होते.

# ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे रामबाग शाखेचे कार्यालय प्रमुख संदेश वाघदरे शिवसैनिक हमिद शेख यांनी शिवसेना शिंदे गटाचे कल्याण मुरबाड जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. या निमित्ताने कल्याणात उध्दव ठाकरे गटाला मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. तर आमदार विश्वनाथ भोईर यांनी संदेश वाघदरे यांची कल्याण -मुरूबाड जिल्हा प्रमुख यांच्या कार्यालयाचा कार्यालय प्रमुख म्हणून नियुक्ती जाहीर केली. यावेळी केडीएमसीचे माजी परिवहन सभापती मनोज चौधरी देखील उपस्थित होते.

# वरळी येथे निरंकारी भक्तांचे रक्तदान




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको' या उदात्त भावनेतून संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने खेडगल्ली म्युनिसिपल स्कूल, वरळी, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १५८ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. संत निरंकारी रक्तपेढी, विले पार्ले मार्फत रक्त संकलन करण्यात आले.

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षा जी यांचे कथन आहे, की जीवन तेव्हाच महत्वपूर्ण ठरते जेव्हा ते इतरांसाठी जगले जाते. हीच शिकवण धारण करुन निरंकारी भक्त निष्काम भावनेने निरंतर मानवतेच्या सेवेमध्ये आपले योगदान देत असतात. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संत निरंकारी मंडळाच्या दादर विभागाच्या संयोजक पूजा चुघ यांच्याहस्ते करण्यात आले. या प्रसंगी मंडळाचे अनेक प्रबंधक व सेवादल अधिकारी उपस्थित होते. या शिबिराला सदिच्छा भेट देणाऱ्यांमध्ये आमदार महेश सावंत, माजी नगरसेवक संतोष धुरी आणि शिवसेना विभाग प्रमुख आशिष चेंबुरकर उपस्थित होते.

संत निरंकारी मंडळाचे स्थानिक मुखी दिनेश गवळकर यांनी स्थानिक सेवादल युनिट आणि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांच्या सहकार्याने या शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन केले.

# खा.सुरेश म्हात्रे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी)**



भिवंडी लोकसभेचे विद्यमान खासदार सुरेश बाळमामा म्हात्रे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मुरबाड तालुका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष यांच्या माध्यमातून वाढदिवसानिमित्त मुरबाड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळवाटप करण्यात आले. रुग्णालयातील डॉक्टर कर्मचारी यांना अल्पहार देण्यात आले तसेच मुरबाड शहरातील नामांकित इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुरबाड तालुका अध्यक्ष दिपक वाघचौडे वतीने करण्यात आले होते, यावेळी जिल्हा सरचिटणीस राजाराम निचिते, सामाजिक न्याय जिल्हा सरचिटणीस नामदेव गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष विलास भावार्थे, ओबीसी तालुका अध्यक्ष शिवाजी धानके, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष रोहित गायकवाड, शहर अध्यक्ष तेजस व्यापारी, युवक अध्यक्ष अभिषेक डुंकवाल,तालुका उपाध्यक्ष गुरुनाथ गोल्हे ,चिटणीस काशिनाथ माळी,जितेंद्र देशमुख, श्याम माळी, योगेश पाटील,शहर उपाध्यक्ष मदन दुधाळे, युवक उपाध्यक्ष दत्ता बांगर यांच्यासह अन्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

दीपक वाघचौडे व पदाधिकारी यांनी हॉस्पिटलला भेट देऊन सर्व डॉक्टर कर्मचारी, रुग्ण यांना भेट देऊन उपक्रमाबद्दल माहिती दिली तसेच हॉस्पिटल प्रशासनाचे आभार मानले.

# विराथन खुर्द येथे बेकायदेशीर उत्खनन

## ग्रामपंचायत व महसूल अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(प्रतिनिधी)**



पालघरः सफाले विराथन खुर्द येथे शासकीय जमिनीवर बेकायदेशीर उत्खनन करून लाखो ब्रास मुरूम चोरल्याच्या गंभीर आरोपाची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाली आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी तातडीने संबंधित विभागाला पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत.

विराथन येथील मा. उपसंरपच जयवंत जगन्नाथ किणी यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, जीआर इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड या कंपनीने ग्रामपंचायत व मंडळ अधिकाऱ्यांच्या संगणमताने शासकीय जमिनीवर जुना तलाव असल्याचे खोटे दाखवून उत्खनन करण्याची परवानगी मिळवली. मात्र, प्रत्यक्षात सदर जमिनीवर कधीही तलाव नव्हता.

ग्रामवासीयांच्या मते, कंपनीने खोटे कागदपत्र तयार करून जिल्हा प्रशासनाची दिशाभूल केली आहे. या प्रकरणी ग्रामपंचायतचे पदाधिकारी व महसूल अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच कंपनीवर गौणखनिज स्वामित्व धन व दंड वसुलीची कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेत संबंधित विभागाला त्वरित पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी पुढील काय कारवाई केली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पेण येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा


**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

पे.ए.सो.च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मराठी विभाग आणि मराठी वाङ्.मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने १४ जानेवारी ते २८ जानेवारी हा कालावधी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हेच औचित्य साधून यंदाही विभागातर्फे मराठी भाषेचे ज्ञान वृद्धिंगत करणाऱ्या विविध माहितीपूर्ण उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले आहे.

सदर पंधरवड्याचा उद्‌घाटन प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल जी. जी. जोशी, मराठी विभागाचे प्रा. डॉ. नामदेव पाटील, प्रा. विजया ठाकूर, प्रा. राधिका गोंधळी, प्रा. सुप्रिया धुमाळ आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना भाषा संवर्धन याविषयी माहिती दिली.तसेच विद्यार्थ्यांनी अचूक मराठी भाषा कशी आत्मसात करावी, यासंदर्भात मार्गदर्शन करणारा माहितीपट दाखविण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. नामदेव पाटील यांनी केले.

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके तर्फे
# अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेणाऱ्यावर केलेली कारवाई



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**भिवंडी(प्रतिनिधी)**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे- नारपोली, हसन मेहता बिल्डिंग समोर, समरू बाग, जूना गौरीपाडा, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी मालक श्री. अब्दुल कलाम शाह (उर्फ बबलू, विकासक), श्री. तबरेज शेख (विकासक) व श्री मोह. सैफ आझाद खान (प्लंबर) यांनी मनपाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता मनपाचा रस्ता खोदून ½' व्यासाचे ११ नळ कनेक्शन अनधिकृतपणे घेतले असल्याने त्यांचेवर भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. (B. N.S) २०२३ चे कलम ३२४(४),३२४ (५),३०३(२) व ३२६(म) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे नारपोली, गोल्डन हॉटेल, जयराम टावरे मार्ग, दूध बावडी नाका, भिवंडी येथे पाहणी केली असता श्री. आतिक खान यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेचा रस्ता खोदून मनपाचा जल वाहिनीला छिद्र पाडून सर्विस सेंटर करिता (व्यापारी) ½' व्यासाचे एक नळ कनेक्शन अनाधिकृत घेतले असल्याचे असल्याने त्यांचेवर निजामपूर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. (B. N.S) २०२३ चे कलम ३२४(४), ३२४ (५),३०३ (२) व ३२६ (म) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, मा. उप अभियंता श्री सर्फराज अंसारी यांचे अधिपत्याखाली श्री विराज विराज भोईर (पथक प्रमुख), नफीस मोमीन (सहा. पथक प्रमुख) यांचे मार्फत करण्यात आली.

# कंत्राटी शिक्षकांची मकर संक्रांत कडू
## तीन महिन्यांपासून मानधन नाही

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(प्रतिनिधी)**

मुरबाड तालुक्यातील पेसा क्षेत्रात नियुक्त केलेल्या कंत्राटी शिक्षकांना मागील तीन महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याची बाब उघड झाली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेकडून जिल्ह्यातील पेसा क्षेत्रात ऑक्टोबर २०२४ पासून कंत्राटी तत्त्वावर व मासिक मानधनावर नियुक्त केलेल्या शिक्षकांना तीन महिने उलटून गेले तरी अजुन कोणतेही मानधन मिळाले नसल्याने या शिक्षकांची आर्थिक कुचंबणा होत असून या कंत्राटी शिक्षकांना लवकरात लवकर मानधन मिळावे अशी मागणी मुरबाड तालुका प्राथमिक शिक्षक संघाने पत्राद्वारे पंचायत समिती मुरबाड शिक्षण विभागाच्या गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे केलेली असून अजुन पर्यंत तरी सबंधित शिक्षकांच्या खात्यात त्यांचे मानधन जमा न झाल्याने त्यांच्यावर आर्थिक संक्रांत आलेली आहे.

**कंत्राटी शिक्षकांना त्यांचे मागील थकीत व चालू महिन्याचे मानधन लवकरात लवकर मिळावे यासाठीचे निवेदन मा. गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे १७ डिसेंबर २०२४ रोजी दिलेले आहे,परंतु अजूनपर्यंत मानधन जमा झालेले नाही.**
***श्री.सोपान गोल्हे ,अध्यक्ष मुरबाड तालुका प्राथमिक शिक्षक संघ***

# रात्रीची मद्यधुंद कल्याण-डोंबिवली आता शांत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**

एकदा काळोखा पडायला लागला की कल्याण, डोंबिवली शहरातील मोकळया जागा, झाडे झुडपे, खाडी किनारे, उड्डाणपूल ठराविक अड्डे मद्यपी, गांजा सेवन करणारे, गुन्हेगार यांनी ओसंडून व्हायचे. रात्री उशिरापर्यंत हे अड्डे आरडाओरडा, शांततेचा भंग करत सुरू असायचे. मागील चार वर्ष हा त्रास नागरिकांनी सहन केला. आता पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी कल्याण पोलीस परिमंडळाचा पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी शहरातील गैरकृत्यांविरुध्द दणके, फटके आणि झोडपशाही सुरू केल्यापासून अनेक वर्ष अस्वस्थ असलेली कल्याण, डोंबिवली आता शांत झाली आहे.

रात्री उशिरापर्यंत कल्याण, डोंबिवली शहराच्या विविध भागात स्थानिक यंत्रणा, राजकीय मंडळींच्या आशीर्वादाने चायनिज हातगाड्या, ढाबे, मद्य, गांजा, अंमली पदार्थ विक्री आणि तस्करीचे अड्डे खुले आम चालायचे. स्थानिक पोलिसांवर वरिष्ठांचे नियंत्रण राहिले नव्हते. या बजबजपुरीमध्ये सामान्य कल्याण, डोंबिवलीकर मात्र खूप अस्वस्थ होता. चार वर्षात माजी



पोलीस उपायुक्तांनी दिवसा, रात्रीच्या गैरकृत्यांविरुध्द कधी आक्रमक भूमिका घेतल्याचे नागरिकांना दिसले नाही.

कल्याण, डोंबिवलीत वाढती गुन्हेगारी, गैरकृत्ये, लैंगिक अत्याचार, हाणामाऱ्या, चाकू, सुरे हल्ले हे प्रकार खूप वाढले होते. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी गेल्या वर्षी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पहिले स्थानिक पोलीस ठाण्यांना आपल्या पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गैरधंदे, गैरकृत्य बंद करण्याचे आदेश दिले. शहराच्या विविध भागात दिवसा, रात्री रस्ते, पदपथ अडवून हातगाडीवर व्यवसाय करणारे, चायनिज, ढाबे चालविणाऱ्यांवर जोरदार कारवाई पोलिसांनी सुरू केली आहे. उपायुक्त अतुल झेंडे अचानक शहराच्या विविध भागात रात्रीच्या वेळेत फेरफटका मारून कुठे गैरकृत्य सुरू आहेत का याचा स्वता अंदाज घेत आहेत. उपायुक्त झेंडे यांनी स्वता प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत जाऊन तेथे मद्य, गांजा, चायनिज, ढाब्यांवर मिळालेल्या सुमारे ७०० हून अधिक मद्यपी, गांजा सेवकांना चांगलीच अद्दल घडवली. त्यांना लाठीच्या माध्यमातून पोलिसी खाक्या दाखविला. हे प्रकार समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याने मद्यपी, अंमली पदार्थ सेवक, गैरधंदे करणाऱ्यांनी आपला गाशा गुंडाळला आहे. रात्रीची आडोशाची तर्र, मद्यधुंद कल्याण, डोंबिवली आता शांत शांत झाली आहे.

# दिव्यांग व्यक्तींसाठी फिजिओथेरपी आणि पुनर्वसन केंद्राचे लोकार्पण

## केडीएमसी क्षेत्रातील दिव्यांगांना मिळणार मोफत सुविधा



खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींसाठी फिजिओथेरपी आणि बहुविद्याशाखीय पुनर्वसन केंद्राचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेकडे सुमारे ५ हजार ५०० दिव्यांग व्यक्तींनी आपली नोंद केलेली आहे. या दिव्यांग व्यक्तींसाठी आतापर्यंत महापालिकेमार्फत फिजीओथेरेपीची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती. परंतु आता महापालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या दिव्यांग आणि मतिमंद व्यक्तींना ही सुविधा विनामुल्य उपलब्ध व्हावी, या दृष्टिकोनातून काढलेल्या निविदेला महापालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड़ यांनी मंजुरी दिल्याने या कामाचे कार्यादेश 'आधार रिहॅबिलेटेड सर्विसेस' यांना देण्यात आले. या केंद्राचा लोकार्पण सोहळा कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते फिजिओथेरपी आणि बहुविद्याशाखीय पुनर्वसन केंद्र (महिला कल्याण केंद्र), सांगळे वाडी, कल्याण (प.)येथे संपन्न झाला. यावेळी केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, आमदार सुलभा गायकवाड, आमदार राजेश मोरे, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, केडीएमसी सचिव किशोर शेळके, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, समाज विभागाचे उपायुक्त संजय जाधव, प्रशांत गवाणकर, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, निलेश शिंदे, उपशहर प्रमुख मोहन उगले, अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, आधार रिहॅबिलेटेशन सर्व्हिसेसच्या संचालक डॉ. सोनल सिंग, व्यवस्थापक जयंत कदम आदी मान्यवर उपस्थित होते. या केंद्रांमध्ये दिव्यांग नागरीक जे अंधत्व, बुटकेपणा, मतिमंद, स्नायु दौर्बल्य, सेरेब्रल पाल्सी, मानसिक आजार, स्वमग्नता ,अध्ययन अक्षमता, थैलेसेमिया, सिकल सेल अनेमिया, वाचादोष, बहुविकलांगता, कर्णबधिरता हिमोफिलीया, लोकोमोटर डिसॅबिलीटी इत्यादी व्याधींनी पिडीत आहेत, अशा दिव्यांग व्यक्तींना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत आधार रिहॅबिलेटेड सर्विसेस यांच्या माध्यमातुन तदअनुषंगिक आरोग्य सुविधा निःशुल्क पुरविण्यात येणार आहेत.दिव्यांग व्यक्तींसाठी पहिल्यांदाच हे फिजिओथेरपी सेंटर कल्याणमध्ये सुरू झालं आहे. खाजगी ठिकाणी गर्दी खूप असते आणि पैसे देखील जास्त असतात. ७ हजार स्क्वेअर फूट जागेत हे सेंटर उभारण्यात आलं आहे. या सेंटरचा लाभ केडीएमसी क्षेत्रातील नागरिकांना मोफत असून इतर ठिकाणच्या लोकांना सवलतीच्या दरात सुविधा मिळणार आहेत. बदलापूर, अंबरनाथ उल्हासनगर आदी ठिकाणचे पेशंट देखील याठिकाणी येतील अशी माहिती खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी यावेळी दिली.

# 'स्टार्टअप्स'साठीचे नवीन धोरण देशातील सर्वाधिक आधुनिक ठरेल
## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी)** :

काळाची गरज ओळखून स्टार्टअप्स धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला असून हे देशातील आधुनिक धोरण ठरणार आहे. या माध्यमातून राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच सिडबी (स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्टअप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तर प्रत्येक प्रादेशिक विभागासाठी तीस कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

बांद्रा-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र **(Empowering Innovation,Elevating Maharashtra)** या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप्स दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते कृत्रिम बुद्धीमत्ता **(AI)** तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन झाले. कार्यक्रमात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रदीपकुमार डांगे, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी, मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाऊंडेशनचे सहसंस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर यासह, स्ट्राइड व्हेंचर्स आणि स्ट्राइडवनचे संस्थापक इशप्रीत सिंग गांधी, आयआयटीचे माजी विद्यार्थी कल्याण चक्रवर्ती, गो इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता, महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील एक हजार स्टार्टअप्स या कार्यक्रमात उपस्थित होते.

### सिडबीकडून स्टार्ट अप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नवं उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप्स सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्टअप्स होते, आज देशात एक लाख ५७ हजार स्टार्टअप्स झाले आहेत. राष्ट्रीय स्टार्टअप्स दिनानिमित्त अभिमानाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप्स क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात



२६ हजार स्टार्टअप्स आहेत. देशात सर्वात जास्त महिला संचालक असलेले महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. स्टार्टअप्समध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे. उद्योजक, दूरदर्शी गुंतवणूकदार, धोरणकर्ते, इन्क्युबेटर्स, विद्यापीठे हे उद्योग क्षेत्रातील बदलाचे प्रणेते आहेत. 'इज ऑफ डूईंग' बिझनेसमुळे उद्योग कमी वेळात सुरू करण्यामध्ये पारदर्शकता आली आहे. गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिला आहे. भविष्यातही मानवी हस्तक्षेप न ठेवता पारदर्शक पद्धतीने उद्योजकांना राज्यात शासना बरोबर उद्योग सुरू करण्याची संधी प्राप्त करून दिली जाणार आहे. भांडवली सहभागाच्या दृष्टीने मुंबई आघाडीवर असून, पुणे तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे केंद्र आहे. आपली टियर-२ आणि टियर-३ शहरे महाराष्ट्राच्या विकासात मोठा हातभार लावत आहेत. नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर ही शहरे स्टार्टअप्सना प्रोत्साहन देत आहेत आणि इकोसिस्टम निर्माण करतात, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स महाराष्ट्राच्या नवकल्पना स्टार्टअप्सला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील नवकल्पना असलेल्या तरुणांचा उद्योगात सहभाग वाढवणार असून, उद्योजकांना मार्गदर्शन, नेटवर्किंग, कायदेशीर सहाय्य इत्यादी सेवा देणाऱ्या इन्क्युबेटर्सना स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे. शासकीय आणि खासगी विद्यापीठे या भविष्यातील स्टार्टअप्सना बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे रोजगार निर्माण करणारे घटक असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. 'ए आय' स्टार्टअप्सचे सक्षमीकरण करून उत्कृष्टतेचे केंद्र बनतील. एआय हे तंत्रज्ञानातील भविष्य असून स्टार्टअप्ससाठी मोठे योगदान देणारे ठरणार आहे. यामुळे केवळ उद्योगाच्या संधी नाही तर रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत. राज्याला स्टार्टअप्समध्ये आघाडीवर आणण्यासाठी राज्य शासनासोबत काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित उद्योजकांना केले.

# उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे क्रीडा सप्ताहाचे आयोजन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी)**

मा. माजी प्रशासक तथा आयुक्त श्री. जमीर लेगरेकर, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या उपस्थितीत दिनांक १३/१/२०२५ ते १७/१/२०२५ पर्यंत अधिकारी/ कर्मचारी, डॉक्टर, क्रीडा शिक्षक, पत्रकार, अग्निशमन विभाग यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. क्रिकेटच्या संघात प्रथम क्रमांक विनोद केणे यांची टिम (पब्लिक हेल्थ विभाग) बॅटमिंटन स्पर्ध्येत श्री. किरण भिल्लारे, मुख्य लेखा अधिकारी, यांनी प्रथम क्रमांक पटकावला. बुध्दीबळ स्पर्ध्येत प्रथम क्रमांकाने विजयी झालेले कर्मचारी संजीव बोराळे आणि हर्षदा भोईर, विद्युत विभाग, कॅरम स्पध्येत प्रथम क्रमांक किरण वाघमारे, विद्युत विभाग, व मंदा आगळे, दिव्यांग विभाग यांनी बाजी मारली आहे.

सदर क्रीडा स्पर्धांच्या कार्यक्रमास मा. नविन आयुक्त तथा प्रशासक श्रीम. मनिषा आव्हाळे. यांनी पहिल्यांदा भेट दिली व खेळ कन्टीन्यु करण्याबाबत निर्देश दिले अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस, अजय साबळे, उप-आयुक्त, सुनिल लोंढे, सहायक आयुक्त (क्रीडा) किरण भिल्लारे, शरद देशमुख, अंकुश कदम, विनोद केणे, अच्युत सासे, विलास नागदिवे, मनिष हिवरे, दिपक धनगर, हनुमंत खरात, विधी अधिकारी, राजा बुलानी. मनपा सचिव, प्राजक्ता कुलकर्णी, राजेश घनघाव, जनसंपर्क अधिकारी, छाया डांगळे, तरूण शेवकानी, सुरेश बोंबे. शांताराम चौधरी, क्रीडा अधिकारी, या मान्यवरांच्या उपस्थितीत खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

# बांधकामाधीन इमारतीवरुन दगड कोसळला
## आठ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण पश्चिम सहजानंद चौक परिसरातील हि घटना असून बांधकाम सुरु असलेल्या इमारतीवरुन दगड कोसळून आठ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे.सुलतान शेख असे जखमी मुलाचे नाव आहे. मुलावर रुग्णाल यात उपचार सुरू आहेत.अशी सूत्रांची माहिती आहे.रस्त्याच्या लगत इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी सुरक्षिततेची उपाययोजना नाही. निष्काळजी करणाऱ्या बिल्डरविरोधात पोलीस केडीएमसी कारवाई करणार का ?असा सवाल संतप्त नागरिकांनी केला आहे.

जीवनदीप वार्ता

# ‘स्वामित्व’ योजनेंतर्गत गावठाण भूमापन सनद वितरण कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.२४ एप्रिल २०२० रोजी स्वामित्व योजनेचे उद्‌घाटन केले होते. या योजनेचा उद्देश गावातील अबादी क्षेत्रातील घरांसाठी सनद व मालमत्ता पत्रक, देणे हा आहे. यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत नकाशांकन तंत्राचा उपयोग केला जातो. ही योजना ग्रामीण समुदायांच्या आर्थिक समावेशनात सुधारणा, पतपुरवठ्यास सुलभता आणि एकूणच सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावते.ठाणे जिल्ह्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी इत्यादींच्या उपस्थितीत स्थानिक कार्यक्रमांद्वारे सनदेचे प्रत्यक्ष वितरण करण्यात येणार आहे. त्यानुसार स्वामित्व योजनेचे लाभ सर्वात महत्वाच्या व शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील अधिनस्त असलेले तालुका ठाणे, कल्याण, शहापूर, भिवंडी, अंबरनाथ मधील एकूण ४३ गावात स्वामित्व योजनेंतर्गत सनद वाटपाचा कार्यक्रम सकाळी ११.३० वाजता संबधित गावांमध्ये आयोजित करण्यात आलेला आहे, असे भूमी अभिलेख जिल्हा अधीक्षक बाबासाहेब रेडेकर यांनी कळविले आहे.

# पानेड येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)

पेण तालुक्यातील पानेड गावच्या हद्दीत ३० वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. गणपत शंकर पवार असे मृत युवकाचे नाव आहे. याप्रकरणी पेण स्टेशनमध्ये अकस्मिक मृत्यूंची नोंद केली आहे.

पेण पोलिस स्टेशनच्या अंतर्गत येणाऱ्या पेण पूर्व विभागातील पानेड गावच्या हद्दीत झाडाला टीशर्टच्या सहाय्याने गणपत शंकर पवार रा , खडकी, आदिवासी वाडीतील युवकाने गळफास घेतला. ही घटना १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांना माहिती मिळताच पेण पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे, पोलीस हवालदार राजेंद्र माने ,प्रशांत पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.पुढील घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राजेंद्र माने हे करीत आहेत.

# शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा कधी?

## पात्रताधारक उमेदवारांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)


राज्यात पवित्र संकेतस्थळामार्फत राबवण्यात येत असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेच्या ऑनलाइन कामकाजासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या कामकाजासाठी खासगी कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून, शिक्षक भरती प्रक्रियेचा दुसरा टप्पा कधी सुरू होणार याकडे पात्रताधारक उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील जिल्हा परिषद शाळा, शासकीय, अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत.रिक्त पदांचा शैक्षणिक कामकाजावर, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. त्यामुळे राज्यात शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्याची घोषणा तत्कालीन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली होती. त्यानुसार पवित्र संकेतस्थळामार्फत शिक्षक भरतीचा पहिला टप्पा राबवण्यात आला. पहिल्या टप्प्यातील भरती प्रक्रियेत १९ हजार ९८६ उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली. पहिल्या टप्प्यातील पदभरती नंतरही शिक्षकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. त्यामुळे भरती प्रक्रियेचा दुसरा टप्पा राबवण्यास मान्यता दिली आहे.

पवित्र संकेतस्थळामार्फत राबवलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यातील कामकाजासाठी ॲन्तोलॉजी इंटरनॅशनल या कंपनीला १८ लाख ५८ हजार ५०० रुपये, तर तलिस्मा कॉर्पोरेशन या कंपनीला ५५ लाख ५५ हजार ५०० रुपये देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आहे तसेच भरती प्रक्रियेचा दुसऱ्या टप्प्यातील कामकाजासाठी तलिस्मा कॉर्पोरेशन या कंपनीला ६८ लाख ८४ हजार १२० रुपये देण्यासही मान्यता देण्यात आली. त्यासाठीचा करारनामा शिक्षण आयुक्तांनी करण्याबाबत शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

तरी शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा सुरू करावा अशी मागणी पात्रताधारक उमेदवारांना केली आहे.

# कुमार आयलानी यांना पुत्रशोक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता उल्हासनगर(प्रतिनिधी)

उल्हासनगर चे भाजप आमदार कुमार आयलानी यांचे पुत्र धीरज आयलानी यांचे निधन झाले आहे. त्यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते अशी माहिती आयलानी यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. धीरज आयलानी हे कुमार आयलानी यांचे पुत्र असले तरी त्यांची उल्हासनगर शहरात उद्योजक म्हणून ओळख होती. कुमार आयलानी यांच्या राजकीय कारकिर्दीत धीरज यांचीही त्यांना मोठी साथ होती. धीरज यांच्या अकाली निधनाने आयलानी कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शुक्रवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास उल्हासनगर कॅम्प तीन येथील सपना गार्डन परिसरात असलेल्या आयलानी यांच्या निवासस्थानाहून धीरज आयलानी यांची अंत्ययात्रा निघेल. तर शांतीनगर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील, अशी माहिती आयलानी यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे.

# नायलॉन मांज्यामुळे घुबड जखमी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

भारतात ‘मकर संक्रांत’ हा सण विविध पद्धतीने आणि नावाने साजरा केला जातो परंतू या सणाचा भाग म्हणजे पतंग उडवणे. यामुळे मनुष्य आणि पशू-पक्ष्यांचे जीवन धोक्यात आले आहे. पतंग उडवताना चायनीज किंवा नायलॉन मांजा वापरला जातो बऱ्याच वेळा या मांज्याला काचेची पावडर लावल्यामुळे अनेक अपघात होतात या पतंग आणि मांज्याच्या वापराने पशु-पक्ष्यांचे जीव गेलेच आहेत पण मनुष्य प्रजातीचे सुद्धा अनेक जीव गेल्याचे कळले आहे

गांधारी परिसरात इंडियन ईगल घुबड जखमी असल्याचे आढळले तत्काळ स्थानिक सर्प रक्षक दिनेश धनगर यांनी तत्काळ त्या पक्षाचे बचाव केला. या पक्षाच्या पंखाला मार लागला असून तो पंख तुटला आहे व हाड बाहेर आले आहे. या पक्षावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नेले असल्याची माहिती वन्यजीव अभ्यासक सुहास पवार यांनी दिली. दिनेश धनगर आणि नरेंद्र भिवंडीकर यांच्या पुढाकाराने पुढील उपचार मिळावे म्हणून स्थानिक वनविभागाच्या मार्गदर्शनाने मुरबाड येथील निवारा केंद्रात मानद वन्यजीव रक्षक यांच्या उपस्थितीत सुरक्षीत सुपूर्द केले.

गळयात मांजा अडकल्याने अनेक अपघात झाले आहेत काही वेळा बाईक चालवणारे नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. तसेच हवेत उडवणाऱ्या पतंगामुळे पक्षी घाबरत असतात तसेच पक्षांच्या पंखांना व मानेभोवती मांजा अडकल्याने पक्षी जखमी होतात किंवा मृत्यू होतो. महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारच्या मांज्यावर बंदी घातली आहे स्थानिक पोलिस अधिकारी सुद्धा योग्य कारवाई करत आहेत. तरीसुद्धा छुप्या पद्धतीने असे चायनीज किंवा नायलॉन मांजा विकले जातात पतंग व माजांच्या वापराने अनेक पक्षी मृत्युमुखी पडले आहेत. अनधिकृत बंदी असलेला मांजा वापरल्यास स्थानिक पोलिस यांच्याकडे तक्रार करू शकतात किंवा वन विभागाच्या हॅलो फॉरेस्ट १९२६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा किंवा पक्षी रक्षक यांची मदत घ्यावी.

# रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा - राजेंद्र गावित आमदार पालघर विधानसभा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(प्रतिनिधी)

पालघर / देवमोगरा फाउंडेशन ट्रस्ट संचलित सूर्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्स, पालघर यांच्या प्रथम वर्षाच्या जी. एन. एम. नर्सिंग विद्यार्थ्यांच्या दीप प्रज्वलन व शपथविधी सोहळा ओस्वाल बिजनेस पार्क चिंतुपाडा पालघर पश्चिम येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्या राजेंद्र गावीत पालघर विधानसभा आमदार यांच्या हस्ते व मान्यवर ह्याच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी गावित यांनी उपस्थितांना नर्सिंग व्यवसायाचे महत्त्व विशद करीत सांगितले 'नर्सिंग हे समाजसेवेतील एक महत्त्वाचे कार्य आहे. या व्यवसायात ‘रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा’ हे व्रत ठेवून काम करणे अत्यावश्यक आहे नर्सिंग व्यवसाय हा मानवतेची सेवा करणारा आणि कौशल्याला अधोरेखित करणारा आहे. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या कार्याचा संदर्भ देत, त्यांनी सांगितले, 'परिचारिका ही रुग्णांसाठी केवळ सिस्टर नसून आईसमान असते, जी त्यांची (रूग्णाची) काळजी घेते व त्यांना सावरण्यास मदत करते. रुग्णाच्या प्रकृतीसाठी ७०-८०%





सेवा नर्सिंग व पॅरामेडिकल स्टाफकडून होते, त्यामुळे ते या व्यवसायातिल खरे हिरो आहेत. सदर विद्यार्थी यांना शुभेच्छा देताना आमदार म्हणाले, ‘तुमच्याकडे असलेले समर्पण, मेहनत, दृढनिश्चय आणि कौशल्य बघून मला अभिमान वाटतो. तुम्ही तंत्रज्ञानाच्या बदलांबाबत सतर्क राहा व स्वतःला सतत सुधारत राहा. नर्सिंग स्टाफ रुग्णाच्या अत्यंत जवळचा व्यक्ती असतो, त्यामुळे नर्सिंग क्षेत्राचे खूप जबाबदारीचे काम आहे. सध्या जगभरात प्रत्येक रुग्णालयात नर्सिंग स्टाफचा तुटवडा भासत आहे. यासाठी देवमोगरा फाउंडेशन ट्रस्ट संचलित सूर्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग सायन्स पालघर यांच्याद्वारे घडणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उत्तम व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देशात व परदेशात भासत असलेल्या नर्सेसच्या तुटवड्यावर परिणामकारक ठरतील व नुसते संस्थेचे, पालघरचे किंवा राज्याचे नव्हे तर संपूर्ण भारताचे नाव जगभरात उज्वलित करतील असेही यावेळी राजेंद्र गावीत यांनी प्रतिपादन केले. यावेळी मान्यवर विलास तरे - आमदार बोईसर विधानसभा यांनी विद्यार्थी यांना मार्गदर्शन करताना सांगितले, नर्सिंग हे सेवाभावी क्षेत्र आहे. सध्याची परिस्थिती पाहता भविष्यात नर्सिंग क्षेत्रात उत्तम संधी निर्माण होणार आहेत. नर्सिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संवेदनशील, दक्षशिस्तप्रिय व समाजसेवा जोपासणे महत्त्वाचे असते. असे सांगून, विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अक्षता राऊत - प्राचार्य यांनी, महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित केलेल्या अभ्यासेतर उपक्रम आणि महाविद्यालयाचा भविष्यातील दृष्टीकोन योजना याबद्दल अहवाल सादर केला. कार्यक्रमाला मान्यवर म्हणून भानुदास पालवे- पालघर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर प्रभारी पोलीस अधीक्षक - बाळासाहेब पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी - संतोष चौधरी, माजी नगराध्यक्ष उज्वला काळे, शिवसेना प्रवक्ते केदार काळे आणि संस्थेचे अध्यक्ष- शांताराम वळवी, सचिव - जतिन संखे, उपाध्यक्ष रुपाली ताई गावित, सदस्य रोहित गावित आदीं उपस्थित होते.

# मातोश्री महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

शहाड येथील शाहू शिक्षण संस्थेच्या मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभाग व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाने निर्देशित केल्यानुसार ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ हा उपक्रम संपन्न झाला.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून राज्यातील विध्यापीठे, महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व सार्वजनिक ग्रंथालये यांच्या माधमातून विध्यार्थ्यांकारिता ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तुत उपक्रमांतर्गत दरवर्षी १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा राबवण्याबाबत शासन परिपत्रकान्वये निर्देश दिले आहेत.





त्यानुसार महाविद्यालयातील मराठी विभागात विध्यार्थी-विध्यार्थीनीसाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमात दि. ३, ८ व १६ जानेवारी २०२५ या कालावधीत प्राचार्य डॉ. डी. एम. मुळे यांच्या अध्यक्षते खाली अनुक्रमे सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन व अभिवाचन असे तीन कार्यक्रम घेण्यात आले. ३ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या पुस्तकाचे एक तास वाचन केले. सदरच्या कार्यक्रमात २१ विध्यार्थी सहभागी झाले. आयक्यूएसी, मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ८ जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात असलेल्या विविध ग्रंथांचे दर्शनी भागात प्रदर्शन भरवण्यात आले. त्या प्रदर्शनाचा सर्व विभागाच्या विद्यार्थ्यांनी आस्वाद घेतला.

विध्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी या साठी दि. १६ जानेवारी रोजी विश्वास नांगरे पाटील लिखित ‘मन में है विश्वास’ या आत्मकथनाचे अभिवाचन कार्यक्रम घेण्यात आला. ‘मन में है विश्वास’ या आत्मकथनाचे पूजा कोरडे, सोनी स्वाईन, अमित साळवे, कस्तुरी पाटील, मेघना भाकरे, गुणवंती पिचड, दिक्षा अहिरे या विध्यार्थ्यानी व प्रा. संजय झुगरे यांनी नांगरे यांच्या हृदयस्पर्शी अनुभवांचे अभिवाचन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एम. मुळे यांनी या प्रसंगी विध्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विशद केले. अभिवाचन कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. चिंतामण भोईर यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करून कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमात एकूण ७३ विध्यार्थी व सर्व विभागाच्या प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

# कल्याणात दुर्मीळ मांजर्या सापाला सर्पमित्राने दिले जीवनदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

कल्याण स्टेशन जवळील दत्त मंदिर परिसरातील एका बिल्डिंग मध्ये रात्री ३ वाजता साप शिरल्याने लोकांनी वॉर फॉउंडेशनचे सर्प मित्र सतीश बोबडे यांना संपर्क केला तेव्हा सतीश बोबडे व साहस बोबडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन सापाचा सुखरूप बचाव केला.

बचाव केलेला सर्प हा मांजऱ्या जातीचा असून कल्याण सारख्या रहदारीच्या ठिकाणी हा सर्प भेटल्याने सतीश बोबडे यांनी आश्चर्य व्यक्त केले. हा सर्प अनेक वर्षांनंतर मिळाला आहें. बचाव केलेला सर्प वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली लवकरच निसर्गमुक्त करण्यात येईल असे सर्प मित्र सतीश बोबडे यांनी सांगितले.

# मुरबाडमध्ये ३ सामूहिक वनहक्क संसाधन व्यवस्थापन आराखडयांना मंजुरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुरबाड(प्रतिनिधी)

अनुसुचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६, नियम २००८ आणि सुधारित अधिनियम २०१२; (वनहक्क कायदा, २००६) या कायद्या अंतर्गत, मुरबाड तालुक्यातील १०१ गावांना सामूहिक वन हक्क प्राप्त झाले आहेत. वन संसाधनांचा शाश्वत वापर करून त्यावर निर्भर असणाऱ्या समुदयांची उपजीविका सुधारण्यासाठीच्या तरतुदी या कायद्याच्या अनुषंगाने आलेल्या विविध शासन निर्णयात आहेत.

याच संदर्भात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्या वतीने पंचायत समिती सभागृह शहापूर येथे ता. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी तालुका कन्व्हर्जन्स समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत टाटा सामाजिक विज्ञान संस्था,




मुंबई यांच्या मदतीने सामूहिक वनहक्क दावा प्राप्त खुटारवाडी, सावरेचीवाडी आणि आंब्याचीवाडी या गावांनी तयार केलेले आराखडे सादर करण्यात आले होते. सादर आराखड्यांवर चर्चा होऊन आराखड्यांना मान्यता देण्यात आली. त्यानंतर तीनही आराखडे जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे ता. ०३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या जिल्हा कन्व्हर्जन्स समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आले. सदर बैठकीमध्ये आराखडयातील कामांचे वाचन झाले व सखोल चर्चा झाली त्यानंतर मा. उप जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तपासणीच्या व पडताळणीच्या अधिन राहुन सर्वानुमते तीनही (खुटारवाडी, सावरेचीवाडी आणि आंब्याचीवाडी) आराखड्यांना मंजुरी दिली. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्याकडून मंजूर झालेल्या आराखडयातील कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठीचे पत्रक ता. १९ डिसेंबर २०२४ रोजी संबंधित विभागांना पाठविण्यात आले आहे.

सामूहिक वनहक्क मान्यताप्राप्त गावांमध्ये शासकीय तरतूदींच्या योग्य अंमलबजावणीसाठी मुरबाड मधील १०१ पैकी ३० गावांमध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई येथील सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलीटी स्टडीज हे सामूहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करणे आणि उपजीविका वृद्धीसाठी कार्यरत आहे. मुरबाड तालुक्यातील आणखी २७ गावांचे आरखडे टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे प्रतिनिधी सुभाष पाटील, कुणाल नक्षणे, ज्योत्स्ना पडवळ, मोहन मेंगाळ आणि योगिनी वारघडे यांच्या मदतीने तयार होत आहेत.

# डोंबिवलीत आठ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

एका आठ वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाल्याची घटना डोंबिवलीत घडली आहे. या प्रकरणात पीडित मुलीचा कुटुंबियांनी मानपाडा पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार केल्यांतर आरोपीच्या विरोधात गून्हा दाखल करून आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. वैभव जितेंद्र सिंग (१९) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीत पीडित मुलगी आपल्या कुटुंबीयांसह राहत आहे. आरोपी वैभव सिंग याची बहीण ट्युशन टीचर आहे. परिसरातील मुलं त्याच्या घरी ट्युशन घेण्यासाठी येत होते. १५ जानेवारी रात्री आठ वाजता पिडीत मुलगी आरोपी याचे घरी ट्युशनसाठी गेली होती, त्यावेळी घरात ट्युशन टीचर नव्हती. तेव्हा आरोपी वैभव याने पिडीत मुलीचा हात पकडून तिला बेडरूममध्ये घेवून गेला आणि बेडरूमची दरवाजाची कड़ी आतुन लावून पिडीत मुलीसोबत जबरदस्तीने बलात्कार केला. घटनेनंतर पीडित मुलगी आपल्या घरी गेली आणि घडलेल्या घटने बद्दल कुटुंबीयांना सांगितले. पीडित मुलीच्या कुटुंबियांनी मानपाडा पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी वैभव सिंग विरुद्ध गुन्हा दाखल केला, त्यानंतर पोलिसांनी ताबडतोड आरोपीला अटक करून तपास सुरु केला आहे.

आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक राम चोपडे यांनी दिली.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी